RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ८, अंक १५] सोमवार, मार्च २८, २०२२/चैत्र ७, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक १९**

**प्राधिकृत प्रकाशन**

### सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ मार्च, २०२२.

### अधिसूचना

क्र.डीआयपी-२०२२/प्र.क्र.२८/३०.—भारतरत्न गानसम्राज्ञी लता दीनानाथ मंगेशकर यांचे रविवार दि. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी मुंबई येथे झालेल्या दुःखद निधनाबद्दल राज्य मंत्रिमंडळाने खालीलप्रमाणे ठराव पारित करून श्रध्दांजली अर्पण केली.

भारतरत्न गानसम्राज्ञी लता दीनानाथ मंगेशकर यांचे रविवार दि. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी मुंबई येथे निधन झाले. संपूर्ण जगाला आपल्या मधुर स्वरांनी मंत्रमुग्ध करणाऱ्या लता मंगेशकर यांच्या निधनाबद्दल राज्य मंत्रिमंडळ तीव्र शोक व्यक्त करीत आहे.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर या प्रख्यात गायक, नाट्य कलावंत, मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ज्येष्ठ कन्या. त्यांचा जन्म २८ सप्टेंबर, १९२९ रोजी मध्यप्रदेश मधील इंदूर येथे झाला. वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर यांनाच लता मंगेशकर गुरूस्थानी मानत. त्यांच्याकडूनच त्यांनी संगीताचे धडे घेतले. त्यांना उषा, आशा, मीना आणि हृदयनाथ ही चार भावंडे. मास्टर दीनानाथ यांच्या निधनानंतर मोठी बहीण म्हणून लता मंगेशकर यांनी जबाबदारी उचलली, आणि पुढे आपल्या सुरेल आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवून त्या लतादीदी म्हणून परिचित झाल्या.

चित्रपटसृष्टीत बोलपटांचा काळ सुरु झाला होता, अन् त्याला लता मंगेशकर यांच्या जादूई आवाजाचा परिस स्पर्श झाला. संगीत क्षेत्रातही तंत्रज्ञानाने क्रांती आणली परंतु लतादीदीचा समधुर स्वर नव्या माध्यमातूनही अधिराज्य गाजवत राहिला. स्वरमंडलातील या सप्तसुरांवर लतादीदींनी केवळ हुकमतच गाजवली नाही. तर त्यांना आपल्या नजाकतीने, लाघवी आणि नम्र स्वभावाने अंकित केले. त्यामुळे संगीतकारांच्या, अभिनेत्रींच्या पिढ्या बदलल्या पण लता मंगेशकर हे नाव ध्रुव ताऱ्याप्रमाणे अढळ राहीले. लतादीदींनी ३६ हून अधिक भारतीय भाषांमध्ये गाणी गायली आहेत. त्यांनी काही चित्रपटांत अभिनयाचीही छाप उमटविली. ‘आनंदघन’ या नावाने काही चित्रपटांना संगीतही दिले, त्यांनी चित्रपट निर्मितीही केली. गाणं कुठलंही असो, त्यामध्ये लतादीदींनी लय, ताल, श्वास, शब्दोच्चार आणि भाव अशा अंगानी परिपूर्ण गायकीचा मानदंड प्रस्थापित केला. मीरा, कबीर, सूरदास, गालिब यांच्या काव्यापासून ते ज्ञानेश्वरांचा अमृतानुभव, तुकारामांच्या गाथेपर्यंत आणि बालकवींपासून, सुरेश भटांपर्यंतचे अभिजात काव्य लतादीदींनी घराघरात पोहचवले आहे.

लतादीदींवर पुरस्कारांचा वर्षाव झाला आहे. सर्वोच्च नागरी पुरस्कार 'भारतरत्न' आणि 'दादासाहेब फाळके' पुरस्कार मिळवणाऱ्या त्या पहिल्या महिला आहेत. त्यापूर्वी पद्मविभूषण, पद्मभूषण असे राष्ट्रीय सन्मानही त्यांना मिळाले आहेत. महाराष्ट्र शासनाने त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांना उत्कृष्ट पार्श्वगायिका म्हणून अनेक पुरस्कार मिळाले. अनेक देशांनी त्यांना सन्मानदर्शक नागरिकत्व आणि किताब दिले आहेत. महाराष्ट्र शासन १९९२ पासून लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्कार देत आले आहे. विविध विद्यापीठांनी त्यांना मानद डॉक्टरेट पदवी बहाल केली आहे.

लतादीदी यांनी सांगितिक कारकिर्दीतून सामाजिक कार्याचा डोंगर उभा केला. अनेक कठीण, बिकट परिस्थितीत त्या समाजाच्या मदतीसाठी धावून गेल्या. महाराष्ट्रातील दुष्काळात निधी उभारण्यापासून ते गोवा मुक्तिसंग्राम, चीनच्या आक्रमणाच्यावेळी राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी, राजस्थानातील दुष्काळ निधीची उभारणी, कारगिल युद्धातील जवानांसाठी निधी यांसह, अनेक शैक्षणिक, सामाजिक संस्था, संघटनांच्या मदतीसाठी त्यांनी गाण्यांचे जाहीर कार्यक्रम केले. मंगेशकर परिवाराच्या विश्वस्तनिधीच्या माध्यमातूनही त्यांनी अनेकांना शैक्षणिक, वैद्यकीय उपचारांसाठी मदत देणे सुरु केले. मास्टर दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाची सुरुवात लतादीदींच्या सामाजिक कार्याच्या वाटचालीतील महत्वाचा टप्पा आहे. लतादीदी चतुरस्त्र होत्या. संगीत-गाणे याच्याशिवाय त्यांनी छायाचित्रण आणि क्रिकेट या आवडत्या छंदावरही मनापासून प्रेम केले. १९८३ च्या विश्वविजेत्या क्रिकेट संघातील खेळाडुंच्या सन्मानासाठी लतादीदींनी आपल्या गाण्याच्या कार्यक्रमातून निधी उभा केला. त्यांनी राष्ट्रभक्तीची बांधिलकी आयुष्यभर जपली.

जगाचा क्वचितच एखादा कोपरा असेल, जिथे लतादीदींचा स्वर पोचला नसेल. भाषा, सीमा-प्रांत, वंश-धर्म असे अनेक बंध तोडून त्यांच्या स्वरांचाच एक प्रदेश, भवताल निर्माण झाला आहे. अशा भारतकन्येचे रविवार दिनांक ६ फेब्रुवारी २०२२ रोजी मुंबई येथे दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्यानं एका स्वर युगाचा अंत झाला, एक महान पर्व संपले.

भारतरत्न लता मंगेशकर यांच्या निधनाबद्दल राज्य मंत्रिमंडळ तीव्र शोक व्यक्त करत असून राज्य मंत्रिमंडळाने व्यक्त केलेल्या भावना भारतरत्न लता मंगेशकर यांच्या कुटुंबियांना कळविण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनु कुमार श्रीवास्तव,**
शासनाचे मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.